# प्रकरण सहावे

## जागतिक विक्रमाचे व कर्मयोगी नगराध्यक्ष - मा.पी.डी. पाटील (१९५३-१९९३)



## प्रकरण सहावे

# जागतिक विक्रमाचे व कर्मयोगी नगराध्यक्ष

## मा. पी. डी. पाटील (१९६३-१९९३)

कराडच्या समाज जीवनाचे आणि सांस्कृतिक संवर्धनाचे शिल्पकार माननीय श्री. पी.डी पाटील यांनी जवळ जवळ चाळीस वर्ष १९५३-१९९३ कराड नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून एक कृतिशिल सौजन्यपूर्ण वैचारिक नेतृत्व दिले आहे. इतका प्रदीर्घ काळ नेतृत्व करुनही त्यांच्या बद्दल लोकांस असणारा आदर व जिव्हाळा सतत वृध्दींगत होत आहे. याचे कारण त्यांनी या प्राचीन शहराला सर्वार्थाने जोपासले आहे [१].

जवळ जवळ चाळीस वर्षे अखंडपणे नगरपालिकेचा अध्यक्ष असण्याची करामत करणारे पी. डी. पाटील हे जगातील एकमेव उदा. आहे. त्यांनी कोल्हापूरातील लॉ कॉलेजमध्ये लॉ ची पदवी घेऊन वकिली व्यवसाय सुरु केला. १९५२ साली ते कराड नगरपालिकेत सभासद म्हणून निवडून आले, आणि थोडयाच अवधीत त्याची नगराध्यक्षपदी निवड झाली व वयाच्या ३४ व्या वर्षी गावातील एक अभ्यासू तरुण वकील म्हणून निवडून आले. सुरुवातीपासूनच कामाची आवड व नगराचा योग्य त-हेने विकास व्हावा ही इच्छा त्यामुळे कराड नगराचा आपल्या परीने त्यांनी विकास घडवून आणणेचा प्रयत्न केला [२].

१९५२ नंतर लगेच एक वर्षात दि. २० डिसेंबर १९५३ रोजी नगराध्यक्ष म्हणून निवडून आले व सलग २ वर्षे या पदावर विराजमान झाले. पुन्हा दि. ३० जानेवारी, १९५६ रोजी पुन्हा नगराध्यक्ष झाले. ते सलग २५ वर्षे म्हणजे ५ फेब्रुवारी, १९८१ पर्यंत या पदावर विराजमान झाले. सन १९७४ ते १९७९ या पाच वर्षासाठी 'नगरसेवका ऐवजी नगराध्यक्षाची सरळ मतदारातून निवडणूक' असा एक प्रयोग शासनाने केला.

त्यावेळी दि. १८ डिसें. १९७४ रोजी सरळ मतदारांनी पी. डी. पाटील यांना नगराध्यक्षपदी निवडून दिले. दि. ५ फेब्रु. १९८१ रोजी महाराष्ट्रातील सर्व नगरपालिका बरखास्त करुन महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय राजवटी आणल्या. १९८५ मध्ये पुन्हा नगरपालिकेची निवडणूक झाली. दि. १४ मे १९८५ रोजी पुन्हा नगराध्यक्ष झाले[१].

१९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीच्या आंदोलनाचा सर्व महाराष्ट्रभर जोर होता. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व नगरपालिका किंवा महानगरपालिका कॉंग्रेस पक्षाच्या हातातून निसटून समितीच्या ताब्यात गेल्या होत्या. त्यातून निदान आपल्या गावची नगरपालिका वाचवावी हा विचार यशवंतराव चव्हाणांच्या मनात येणे सहाजिकच होते. त्यासाठी एखाद्या कर्तबगार आणि विधायकदृष्टी असलेल्या व्यक्तीच्या हाती गावाचा कारभार सुपुर्त करणे अगत्याचे होते. याद्दष्टीने त्यांनी या कामासाठी पी. डी. पाटील यांची निवड केली, त्यांनी यथार्तपणे सांभाळली. पण १९५७ ते १९६२ पर्यंतचा काळ हा नगराध्यक्ष म्हणून त्यांना सोपा नव्हता. मतभेद, वादावादी, पाटर्या अशा संघर्षाने तो भरला होता.

त्यावेळी नगराध्यक्षावर अविश्वास ठराव संमत करावयाचा असेल तर दोन तृतीयांश बहुमताची आवश्यकता असे. त्याच्यावरही तो आणला गेला. पण काही काळ अल्पमत गटाचा नगराध्यक्ष आणि त्यांच्या बहुमतवाल्या गटाकडे सत्ता असे स्वरुप राहिले. नगरपाकिलेची त्या काळातील प्रत्येक सभा गाजत होती. वादावादी, मतभेद उफाळून येते. पुढे समझोता घडला आणि हा कालखंड संपला.

यानंतर १९६२ नंतर मात्र नगरपालिकेच्या कामाला एक वेगळी दिशा मिळाली. नगराध्यक्ष पी. डी. पाटील यांनी एखादी आघाडी करुन किंवा पार्टी करुन कधी निवडणूक लढवली नाही किंवा तसे कोणाला पार्टी करणेबद्दल प्रोत्साहन दिले नाही. नगरपालिका हे राजकीय संघर्षाचे ठिकाण नाही. त्यामुळे कॉंग्रेस पक्षाच्या वतीने कधी

निवडणुका लढविल्या गेल्या नाहीत. ज्याने त्याने आपले लोकमत अजमावून नगरपालिकेत निवडून यावे मग मात्र नगरपालिकेच्या चाकरी बाहेर आपले राजकीय विचार ठेवावेत. नागरी कारभार करता आप आपसातील मतभेदांना वाव देवू नये ही प्रत्येक गोष्ट नागरी हीत आणि नगरविकास या कसोटयावर घासून घ्यावी. त्यासाठी गटबाजीला वाव देवू नये. सर्वांनी एक पार्टी म्हणून बसावे. सर्वधारण सभेत एकमताने निर्णय घ्यावेत असा पायंडा त्यांनी पाडला व कराड शहरचा विकास झाला. नगरपालिकेत त्यावेळी जनसंघ कम्युनिस्ट पक्ष कॉंग्रेस असे विविध राजकीय विचारांचे त्या संबंधी आग्रही भूमिका असणारे नगरसेवक निवडून येत . पण राजकिय अविर्भाव बाजूला ठेवत.[४]

मा. पी. डी. पाटील यांनी शहराचा कारभार करताना एक नवा विचार किंवा नवी आचार संहिता आख्या महाराष्ट्रापुढे ठेवली. नागरी कारभार करीत असताना राजकारण, जात, पात, धर्म, पक्ष, गट ही माणसा भोवतालची कृत्रिम अवरणे नगरपालिकेच्या चौकटी बाहेर ठेवायला लावली आणि सर्व लोक प्रतिनिधींना एकत्र करुन आपण 'फक्त नागरी प्रश्नासाठी नगरपालिका' हा नवा सिध्दांत समाजापुढे ठेवला. परिणामी १ एप्रिल, १९६० पासून ५ फेब्रवारी, १९८१ पर्यंत सलग २१ वर्षे नगरपरिषदेचे सर्व ठराव एकमताने झाले.

यशवंतराव चव्हाणांनी पी. डी. पाटील यांच्यातील गुण हेरले आणि त्यांनी कराडच्या विकास कार्यात सहभागी करुन घेतले. पी. डी. पाटील यांनी मा. यशवंतरावजी चव्हाण आणि विकास कार्याचा ध्येयवादी वारसा यावर निष्ठा ठेवून त्यांनी अथक परिश्रम केले.[५]

दै. मराठा मध्ये आचार्य अत्रे यांनी लिहिलेल्या एका परिच्छेदावरुन आपल्याला त्यांच्या कार्याची कल्पना येते.[६] दै. 'मराठा' च्या दि. २६ ऑक्टो. १९६२ च्या

आवृत्तीत 'पालिकेचे बदलते स्वरुप' या शिर्षकाखाली आलेले स्फुट असे ''मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांचे कराड हे गाव व कर्मभूमी अनेक नवनव्या सुधारणांनी झपाटयाने बदलत आहे. गावाच्या बहिरंगाच्या पालटापेक्षाही गावक-यांच्या अंतरंगात झालेल्या बदलाला एकमताने सर्व ठराव उपसूचना नाहीत वाद नाही गदारोळ नाही मारामारी नाही-सभात्याग नाही-ठरावानंतर आपआपल्या भूमिका समजाऊन देणा-या पत्रकाचा वर्षाव नाही. सर्व ठराव एकमताने मंजूर करण्याचा पायंडा हे सर्व नगरपालिका पक्ष विरहीत विकासाची कामे करते हे दर्शविते. ही सर्व किमया कराड नगरपालिकेचे नगराध्यक्ष पद भूषवित असलेल्या श्री. पी. डी. पाटील यांच्या कुशल आणि दुरदर्शी नेतृत्वामुळे घडत आहे.'' कराड नगरपालिकेप्रमाणे इतरही नगरपालिकांनी नगर व नागरिक यांच्या विकासावरच शक्ती केंद्रित ठेवल्यास आज इतर नगरपालिकांना आलेले बेबंद स्वरुप नाहीशे होईल.

**कराड नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून पार पाडलेली कामे-**

मा. पी. डी. पाटील यांची कराड नगरपालिकेवरील प्रदीर्घ कारकिर्द निश्चितच अभिमानास्पद आहे. या कालखंडात शहरात जो विधायक कामाचा मोठा डोंगर उभा केला त्याला नगरपालिकांच्या इतिहासात तोड नाही. तसेच त्यांच्या कारकिर्दीत काही अपवादात्मक वर्षे वगळता सर्व ठराव एका विचाराने एकमताने संमत झाले हा एक विक्रम मानावा लागेल. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक कौतुकास्पद कामे पार पाडली ती खालील प्रमाणे-

**शहरातील रस्ते -**

कराड हे अतिप्राचीन शहर असल्यामुळे सततच्या अतिक्रमणामुळे शहरातील रस्ते अरुंद वेडेवाकडे व गल्ली बोळाचे होते. शहर सुधारणेच्या मार्गातील ही सर्वात मोठी अडचण होती शहरातील रस्त्यांच्या रुंदी करणाचा व नवीन रस्त्याचा आराखडा

सन १९४८ साली तयार करण्यात आला होता. त्या आराखडयानुसार रस्ते रुंदी करण्याच्या कार्यक्रमास नगरपालिकेने अग्रक्रम दिला आणि त्या कामाचा १९५५ सालापासून सातत्याने व नियोजनबध्द पाठपुरावा करुन मास्टर प्लॅनप्रमाणे रस्त्याच्या रुंदीकरणाचे व नवीन रस्ते बांधण्याचे काम ९९% पूर्ण केले. शहरातील पहिला डांबरी रस्ता पटेल चौक ते मंगळवार वेस सन १९५४ मध्ये झाला. सन १९५३ ते ५४ साली १५.५० कि. मी. लांबीचे कच्चे खाडीचे असे रस्ते बांधले. डांबरी रस्ते ३५.५९ कि. मी. खडीचे रस्ते २.६१ कि. मी. व मुस्माचे १.१४ कि.मी. असे ३९.३४ कि. मी. लांबीचे रस्ते बांधले. गटारांची लांबी सन १९५३-५४ ला ११ मैल होती.[९]

### स्मशान भूमी -

शहराचे पारंपारिक स्मशान [illegible] नदीच्या [illegible] पात्रात होते. पावसाळयात नद्यांना पूर येऊन फार मोठी अडचण होत असे. या सर्व गोष्टींचा विचार करुन सन १९७२ मध्ये ८० हजार रु. खर्च करुन नवी स्मशान भूमी तयार केली व तेथे अंत्यविधीची सोयीसाठी दोन वेटींग शेड्स बांधलेत.[६]

### स्ट्रीट लाईट -

रस्ता रुंदी गटारे, रस्त्याचे डांबरीकरण या बरोबर स्ट्रीट लाईट हे कामही परिपूर्ण केले. शहरातील रस्ते रुंदी बरोबर जागोजाग रस्त्यात आलेले वीजेचे खांब बाजूला घेऊन स्ट्रीट लाईट सरळ करण्यात आले. तसेच नवीन लाईट जोडण्यासाठी आणि शहरातील प्रत्येक रस्त्यावर वीजेच्या दिव्याची सोय केली. सन १९६१ मध्ये बल्ब ऐवजी स्ट्रीट लाईट फिक्सर्स बसविणेस नगरपालिकेने सुरुवात केली. तसेच चौकात मर्क्युरी लॅम्पस बसविले[१].

**कार्यालयीन इमारत -**

या नगरपालिकेस सन १९५५ सालापर्यंत शंभर वर्षाच्या काळात स्वतःची इमारत नव्हती. रविवार पेठेतील पाण्याचे टाकीखाली पूर्वी नगरपालिकेचे ऑफिस होते काही खाती गावात इतर ठिकाणी होती. त्यामुळे कामात एकसुत्रीपणा आणणे त्रासाचे होते. तसेच ऑफिसला ही जागा अपुरी पडत होती. म्हणून १९५७ साली नगरपालिकेने कार्यालयासाठी एक भव्य प प्रशस्त इमारतीचे पी. डी. पाटील यांच्या काळातील महत्वाचे काम पूर्ण झाले. या इमारतीमुळे नगरपालिकेची सर्व खाती एकत्र आली व कामात सुसुत्रता निर्माण झाली". ही दुमादार वास्तू म्हणजे कराडच्या सन १९५६ नंतरच्या विकासाचे केंद्रस्थान आहे. नागरिकांच्या दृष्टीने ही वास्तू म्हणजे त्यांच्या सार्वजनिक जीवनाचे 'घर' बनले आहे. रोटरी, लायन्स यासारख्या अनेक सार्वजनिक संस्था अनेक वर्षे आपल्या कार्यालयासाठी या वास्तूचा वापर करीत एवढेच नव्हे तर यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, सहयाद्री सहकारी साखर कारखाना, प्रीतिसंगम सहकारी पाणी पुरवठा संस्था अशा अनेक संस्थांची ही वास्तू जननी आहे.

**भाजी मार्केट -**

शहराचे नागरीकरण करण्यात पी. डी. पाटील यांची गतिमानता पदोपदी दिसून येते. १९६२ साली एक प्रशस्त भाजी मार्केट बांधण्यात आले. तसेच शेजारी १९६८ साली नवीन फीश व मटण मार्केट बांधण्यात आले. भाजी मार्केटच्या बाहेरच्या बाजूस २३ छोटे गाळेही बांधले."

**शॉपींग सेंटर्स -**

शॉपींग सेंटर्समुळे नागरिकांची व व्यापा-यांची सोय झालेली आहे. तसेच नगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडावी, सार्वजनिक इमातरीचे संरक्षण व्हावे हा या मागील हेतू होता आणि त्यासाठी शहरामध्ये प्रमुख चार ठिकाणी नगरपालिकेच्या

मालकीच्या इमारती लगत शॉपींग सेंटर्स बांधली. त्यात सुमारे आठ वेगवेगळया प्रकारचे गाळे आहेत. नगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीलगत ही शॉपींग सेंटर्स बांधल्या मुळे पर्यायाने उत्पन्नाबरोबरच इमारतीच्या सुरक्षिततेची सोय झाली''.

## भुयारी गटार योजना -

भुयारी गटार योजना ही सुधारणेची एक सर्वात महत्वाचा टप्पा आहे. पी. डी. पाटील यांनी या छोटयाशा गावात गावाच्या स्वच्छतेसाठी गावाला आधुनिक रुप देण्यासाठी पूर्ण केलेली भुयारी गटार योजना महाराष्ट्रातील मोठमोठया शहरांना जे जमले नाही ते त्यांनी आपल्या कर्तुत्वाच्या आधारे कराड मध्ये प्रत्यक्षात आणून दाखविले. १९६५ साली ५५ लाख रु. खर्चाची भुयारी गटर योजना हाती घेतली व ३ ४ वर्षात ती पूर्ण केली. या योजनेस ३३% शासकीय अनुदान व ६७% नगरपालिकेने खर्च केले. यासाठी एल. आय. सी. ने कर्ज घेतले. १९७४ साली ही योजना पूर्ण झाली''. शहरातील बहुतेक सार्वजनिक व खाजगी संडास, मो-या भुयारी गटार योजनेस जोडण्यात आल्या. त्यामुळे शहरातील स्वच्छता व आरोग्य यामध्ये क्रांतिकारक बदल झालेला आहे.

## हौसिंग सोसायटी -

इतर नागरी कामाबरोबरच नगरपालिकेच्या तृतीय श्रेणीतील कामगारांच्या समस्येकडेही लक्ष दिले आहे. नगरपालिकेतील स्वच्छता कामगारांसाठी १९६१-६२ साली व सन १९६४-६५ साली घरांची योजना घेऊन ती पूर्ण केली. ५३ स्वच्छता कामगार कुटुंबांची त्यात सोय करण्यात आली. मागासवर्गीयांना घरे बांधून देण्याची पुरोगामी योजनाही प्रत्यक्षात आणल्या. त्यासाठी 'नवयुग बॅकवर्ड क्लास हौसिंग सोसायटी' निर्माण करुन सन १९८० ते १९९२ या एका तपात रु.१०,२८,५४५ खर्च करुन ८५ कुटुंबांना स्वतंत्र घरकुले बांधून दिलीत. रस्त्याकडेला अनेक ठिकाणी तसेच

सुपर मार्केटच्या नियोजित जागेत झोपडपट्टी होती, तिची नगरपालिकेने पाहणी करुन नोंद केली व या झोपडपट्टीसाठी अगाशिव डोंगराचे पायथ्याशी १६ एकर १० गुंठे जागा दि. १६ एप्रिल, १९९० रोजी संपादित केली. तिची किंमत रु.५४,६०० शासनाकडे भरलेत. तसेच त्या ठिकाणी रस्ते, वीज, पाणी याची सोय करुन ६५० झोपडपट्टीयांचे तिथे पुनर्वसन करणेची योजना आखली. आतापर्यंत २५० ते ३०० प्लॉटसचे वाटप करुन त्यांनी तेथे घरकुलेही बांधली आहेत. याकामी कराड नगरपालिकेने सुमारे रु. ३,६१,००० खर्च केले आहेत.[१४]

**पाणी पुरवठा सोय -**

गावाच्या स्वच्छतेसाठी भुयारी गटार योजना याबरोबर स्वच्छ व मुबलक पाणी याकडेही दूरदृष्टीने पाहिले. शहराचा विस्तार व लोकसंख्या वाढत गेल्याने सुधारित पाणी पुरवठा केला. १९७४ साली एक लाख गॅलन क्षमतेचा मार्केट यार्ड येथे जलकुंभ बांधण्यात आला. दरम्यान १९५३ साली मीटर पध्दतीने पाणी पुरवठा सुरु करण्यात आला. सन १९७८ पर्यंत त्यात वरचेवर सुधारणा केल्या.

१९९२ पासून कराड शहरास शुध्द व स्वच्छ व भरपूर पाणी पुरवठा केला. या सुधारित योजनेची क्षमता १८ दशलक्ष लिटर्स आहे.[१५]

**सार्वजनिक सभा स्थान -**

गावात सार्वजनिक सभा स्थान उपलब्ध असल्याने नगरपालिकेने मंडईजवळ नगरपालिका इमारतीसमोर सार्वजनिक व्याख्यानासाठी एका सभा स्थान इमारतीची सोय केली.[१६]

**केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक नगर विकास प्रकल्प -**

कराड शहराच्या वाढत्या व्यास अधिक नीटनेटकेपणा देणेसाठी आणि विविध व्यवसायासाठी आणि व्यावसायिकांची सोय करण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत

एकात्मिक नगर विकास योजनेचा महत्वाकांक्षी प्रकल्पही हाती घेतला व सुमारे एक कोटी रुपये त्याचा खर्च केला जाई.[१७]

**भूकंपग्रस्तांना मदत -**

सन १९६७ साली कोयनेचा जो प्रलयकारी भूकंप झाला, त्यावेळी शहरातील भूकंपग्रस्तांना भरीव मदत नगरपालिकेनी केली.[१८]

**ग्रंथालय -**

कराड शहरातील लोकांचा बौध्दिक विकास होण्यासाठी तसेच त्यांच्या ज्ञानात नवीन भर पडण्यासाठी आपल्या कालखंडात त्यांनी लायब्ररी या गोष्टीकडे विशेष लक्ष दिलेले दिसून येते. १९५२ साली हे सार्वजनिक वाचनालय लोकांनी नगरपालिकेच्या स्वाधीन केले व या वाचनालयाचा सर्वांगिण विकास घडवून आणला. लोकांच्या आवडीनुसार नवनवीन ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे, साप्ताहिके यांच्या संख्येत भरीव वाढ केली. १९६४-६५ सालापासून नगरपालिकेच्या अंदाजपत्रकात ग्रंथालयाच्या वार्षिक खर्चासाठी स्वतंत्र भरीव रक्कमेची तरतूद करण्यास सुरुवात केलीत. त्यामुळे सर्व विषयाची पुस्तके जवळजवळ ५० हजाराचेवर असून त्यामध्ये सर्व विषयातील भरपूर व अद्ययावत संदर्भ ग्रंथांचा समावेश आहे व सुमारे ५० हजार वर्गणीदार याचा लाभ घेतात.

सन १९८६ पर्यंत हे वाचनालय नगरपालिकेच्या कार्यालयीन इमारतीत होते. १९८७ पासून यशवंतराव चव्हाण स्मृति सदनातील भव्य दालनात ते स्थलांतरीत करण्यात आले. हा संपूर्ण प्रकल्पच कराडच्या सांस्कृतिक वैभवाचा मानबिंदू बनविला. महाराष्ट्रातील असंख्य नामवंतांनी या ग्रंथालयाला भेटी दिल्या आहेत. कल्पकता, भव्यता आणि ग्रंथालय चळवळीस पोषक बनविलेले येथील वातावरण याची मुक्त मनाने त्यांनी स्तुती केलेली आहे. या ग्रंथालयात यशवंतराव चव्हाण साहित्य दालन

आहे. त्यात यशवंतरावजींनी लिहिलेले साहित्य, त्यांच्यावर आणि त्यांच्या साहित्यावर इतरांनी लिहिलेल्या व प्रकाशित केलेल्या साहित्याचे स्वतंत्र दालन आहे. मा. पी. डी. पाटील यांनी या ग्रंथालयास सांस्कृतिक चळवळीचे अग्रमानांकर प्राप्त करुन दिले आहे.[११]

**व्याख्यानमाला -**

नगरपालिका ग्रंथालयामार्फत सांस्कृतिक वाड.मयीन चळवळीसाठी प्रतिवर्षी कांही उपक्रमांचे नियोजन अत्यंत दूरदृष्टीने केले आहे. यात शारदीय व्याख्यानमाला, साने गुरुजी कथामाला तसेच यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालांचे नियोजन केले.

कराडचे सुपूत्र यशवंतरावजी चव्हाण यांच्या रुपाने प्रजाप्रचीतीचे राजकीय आणि सामाजिक अष्टपैलू व्यक्तिमत्व कले-कलेने साकार होत गेले त्याचा आचार-विचार नि उच्चार समाज परिवर्तनाला उपकारक ठरेल या भावनेने तसेच भारतीय समाजाच्या नि राष्ट्रीय जीवनाच्या समस्या, आव्हानाचे स्वरुप घेवून आपल्या पुढे ठाकल्या आहेत त्या सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा अभ्यासपूर्ण ऊहापोह अधिकारी व्यक्तींच्या आयोजित व्याख्यानातून व्हावा व आदरणीय यशवंतरावजी चव्हाण यांनी चालविलेले समाज प्रबोधनाचे व परिवर्तनाचे कार्य सतत तेवत रहावे या जाणीवेने १२ मार्च, १९७३ पासून मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या नावाने व्याख्यानमाला सुरु केली, ती [illegible] माजी नगराध्यक्ष मा.श्री पी.डी. पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी. यात पी.डी. पाटील यांची योजकता व समयसूचकता सिध्द होते.[१२]

**शिक्षण -**

गावाच्या शिक्षण क्षेत्रातही पी.डी. पाटील यांनी केलेली कामगिरी अनमोल आहे. अर्थात शिवाजी शिक्षण संस्था, त्याचे उच्च शिक्षण मंडळ असे पी.डी. पाटील

यांचे कतृत्व जरी नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात येत नसले तरी प्राथमिक शिक्षणाबाबत त्यांनी प्रथमपासून स्विकारलेली भूमिका हीही कराडच्या शैक्षणिक क्षेत्रातील क्रांती मानावी लागेल.

१९७६ पर्यंत शाळांची अवस्था शोचनीय होती. शाळांच्या इमारती गैरसोयीच्या व पडीक अवस्थेत असल्याने प्राथमिक शिक्षणाची मोठी गैरसोय होत होती. अशा शाळात येणारे विद्यार्थी गरीब व शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातील असत. वस्तूतः त्या काळात प्राथमिक शिक्षणाची कसलीही जबाबदारी नगरपालिकेवर नव्हती. पण ही मुले आपलीच आहेत ही विशाल दृष्टी स्वीकारुन या कार्यात पुढाकार घेऊन प्राथमिक शाळांच्या इमारती बांधण्याचा एक महत्वाकांक्षी प्रकल्प त्यांनी साकार केला व शिक्षण मंडळाचे चेअरमन झाल्यानंतर अनेक सुधारणा या क्षेत्रात केल्या.[२१]

**शिवाजी स्टेडीयम -**

मा. पी.डी. पाटील यांच्या कतृत्वाची आणखी एक निशाणी म्हणजे शिवाजी स्टेडीयम क्रीडा संकुल मोठ मोठया शहरांना हेवा वाटावा असे हे संकुल आहे. कारण कराडला विद्यानगरी म्हणून ओळखले जाते. त्यामुळे अनेक विद्यालयीन, महाविद्यालयीन युवकांची संख्या खूप आहे. शहरातील मुलांना सर्व प्रकारच्या खेळाची एकत्रीत सोय व्हावी म्हणून शहराच्या विकास योजनेखाली सुमारे सहा एकर जागा खरेदी केली व हे क्रीडा संकुल उभारले. ४०० मीटर ट्रॅक सहज येथे बसू शकतो. तसेच कॉमेंट्री बॉक्स, स्वच्छतागृहे, बॅडमिंटन आदी खेळांसाठी ९५ x ६० फूटाचा जिम्नॅशियम हॉल, टर्फ, पूर्व-पश्चिम व उत्तर बाजूस तारेचे कपाऊंड, स्टेडीयम स्टेप्स बाहेर झाडी आहे.

स्टेडीयमच्या पाय-या बांधण्याच्या कामास सन १९७१ मध्ये सुरुवात होऊन **१९७२ ला काम पूर्ण झाले व २९ एप्रिल, १९७३ रोजी क्रिकेट महर्षी प्रा. डी.बी.** देवधर यांच्या अध्यक्षतेखाली कसोटी वीर श्री चंदू बोर्डे यांच्या हस्ते शिवाजी स्टेडीयमचे उद्‌घाटन झाले. विविध खेळांचे सामने येथे होतात. महाराष्ट्र विरुध्द मुंबई, राजस्थान विरुध्द महाराष्ट्र असे रणजी करंडक क्रिकेट सामने येथे खेळले गेले.[२२]

**प्रितीसंगम योजना -**

कृष्णा-कोयना काठ आणि त्यांचा प्रितीसंगम या परिसराला कराडच्या सांस्कृतिक जीवनात पूर्वापार पावित्र्याचे स्थान लाभलेले आहे. यशवंतरावजी चव्हाण यांचे तर या परिसराशी भावनात्मक नाते जुळलेले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी एकदा या परिसराला भेट दिली आणि आपल्या मनातील कल्पना [illegible] शब्दबध्द करुन नगराध्यक्ष या नात्याने पी.डी. पाटील यांना १६ मे, १९६१ रोजी पत्र लिहिले. यशवंतराव चव्हाणांचे हे स्वप्न त्यांनी साकार करुन या परिसराचा कायापालट घडवून आणला.

यशवंतरावजींच्या इच्छेस अनुसरुन नगरपालिकेने भुईकोट किल्याचा तट व नदी यांच्यामधील प्रितीसंगमालगतची सुमारे साडे सात एकर जमीन संपादित केली. २५ नोव्हेंबर, १९८४ रोजी यशवंतरावजींचे निधन दिल्ली येथे झाले. त्यांच्या पार्थिव देहावर दि. २७ नोव्हेंबर, १९८४ रोजी प्रितीसंगमावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या जागी यशवंतराव चव्हाण यांचे एक राष्ट्रीय स्मारक उभारण्याची कल्पना प्रत्यक्षात आणली. कोल्हापूरचे आर्किटेक्ट श्री बेरी यांनी समाधीचे डिझाईन अत्यंत अभ्यासपूर्ण तयार केले. पूण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रायगडावरील समाधीच्या धर्तीवर ही समाधी अष्टकोनी असून तिची लांबी रुंदी २०' x २०' आहे. समाधीचे

सभोवतालचा परिक्रमा ८ फूट व ६ इंच रुंदीचा आहे. समाधीच्या पूर्वेस पाणघाटावर ३०' x ३०' आकाराचा अष्टकोनी चौथरा आहे.

समाधीचे सर्व काम भक्कम, कलापूर्ण व आकर्षक आहे. यावरुन पी.डी. पाटील यांच्या वैशिष्टयपूर्ण प्रतिभाशक्तीचा अलौकिक अविष्कार आहे. समाधी स्लॅब टाकणेपूर्वी त्यामध्ये एक ताम्रमंजुषा ठेवलेली आहे. त्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य, त्यांच्यासंबंधीचे ग्रंथ, त्यांची भाषणे लेख, नियतकालिके, विशेषांक, दैनिके, साप्ताहिके, पत्रे, छायाचित्रे आदि साहित्य ठेवले आहे. ताम्रमंजुषेवर त्यांचे जीवनचरित्र कोरलेले आहे. समाधीच्या दक्षिण पूर्व कोप-यात ५०' x २३' आकाराची एक पर्णकुटी आहे.

या सर्व साडे सात एकराचे परिसरात एक नयनरम्य उद्यान बनविण्यात आलेले आहे. त्याचे आराखडे पुण्याचे गार्डन आर्किटेक्ट, श्री जयंत धारप यांनी केले आहेत. नागमोडी रस्ते, छोटया उंचीची टुमदार विविध प्रकारची झाडे, प्रशस्त हिरवळ, फुलांचे मनोहर ताटवे.

देशभरातून असंख्य लोकांची यशवंतरावजींच्या या राष्ट्रीय स्मारकास आणि परिसरास भेट देण्यासाठी नेहमीच वर्दळ चालू असते.

मा. यशवंतरावजींच्या या राष्ट्रीय स्मारकापैकी समाधी, पर्णकुटी घाट, संरक्षक भिंत, ग्रील इ. मुख्य कामावर झालेला खर्च अंदाजे रु. ३० लाख पी. डी. पाटील यांनी स्वतःच्या जबाबदारीवर मुख्यतः सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे सभासद आणि नामदार शरद पवार व जिल्हयातील आमदार यांच्या सहकार्याने उभारला. त्या खर्चाचा बोजा म्युनिसीपल फंडावर पडू दिला नाही. फक्त उद्यान तयार करण्याचा खर्चच म्युनिसीपल फंडातून झालेला आहे.[२३]

**नाटयगृह -**

ग्रंथालयाच्या वरच्या मजल्यावर यशवंतराव चव्हाण स्मृति सदनाचे भव्य सांस्कृतिक केंद्र आहे. नाटयगृह ११८ फूट लांब व १६७ फूट रुंद आहे. त्याची उंची ३४ फूट आहे. आत एक ६७ फूट x २६ फूट अशी बाल्कनी आहे. नाटयगृहात एकूण ९२८ बैठक व्यवस्था आहे. नाटयगृहाच्या पुढील बाजूस १५ फूट x १९ फूटाचे फायर आहे. नाटयगृहाचे स्टेज ३८ फूट x २६ फूटाचे आहे. नाटयगृहाच्या मागील बाजूस उपहारगृह व ११५ फूट x २५ फूटाचे ओपन टेरेस आहे.[२४]

**इतर कार्ये -**

१९७४ साली नगरपालिकेच्या सभेत शहरात मान्यवर नेत्यांचे व व्यक्तींचे पुतळे उभारण्याविषयी नगरपालिकेचे सावधानतेचे धोरण निश्चित करुन तसे नियम मंजूर केलेत. १९७४ साली दलितांसाठी समाजकल्याण केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला. तसेच ६,७,८ डिसेंबर, १९७५ साली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, कराड येथे झाले. त्यासाठी जे सहकार्य केले त्यामुळे आणीबाणीच्या काळात झालेले साहित्य संमेलन खूप यशस्वी झाले.[२५]

**मान्यवरांचा अभिप्राय -**

पी.डी. पाटील यांनी नगराध्यक्ष असताना केलेल्या कार्याचा गौरव करताना अनेक मान्यवरांनी कौतुकास्पद उद्‌गार काढले. भारताचे एक नेते सी. राजगोपालचारी दि. २५ नोव्हेंबर, १९६० रोजी कराडला आले होते. तेंव्हा नगरपालिका कार्यालयाची भव्य वास्तू पाहून इतक्या थोडया खर्चात एवढी प्रशस्त व अलिशान इमारत अल्पावधीत बांधल्याबद्दल आणि प्रामाणिकपणा, सचोटी आणि कार्यक्षमता व दूरदृष्टीबद्दल त्यांनी पी.डी. पाटील यांना धन्यवाद दिले.

तसेच संत फुटाणे यांनी त्यांच्या कार्याविषयी खुलासा देताना म्हणाले, 'आम्ही ज्ञानेश्वरी वाचतो, लोकांना सांगतो, प्रबोध करतो, मात्र तुम्ही ज्ञानेश्वरीतील कर्मयोग प्रत्यक्ष आचरणात आणत आहात. तेच व्रत शक्यतोवर चालू ठेवा.'

उत्तर प्रदेशातील नैनीताल येथील अॅकॅडेमी ऑफ अॅडमिनिस्ट्रेशनच्या संचालक श्रीमती सुनिता खंडपाल यांनी कराड शहरास भेट दिली तेंव्हा भारावून जाऊन त्या म्हणाल्या - 'दूरदृष्टी ठेऊन कामाचे नियोजन केले व नागरी प्रश्नांना प्राधान्य दिले तर स्वबळावर नगरपालिका किती उत्तम त-हेने काम करु शकते याचे उदाहरण म्हणून कराड नगरपालिकेचा उल्लेख करावा लागेल.'

महाराष्ट्र शासनाचे नगरविकास खात्याचे सचिव व नगरपालिका प्रशासनाचे संचालक श्री सतिश त्रीपाठी यांनी भेट दिली तेंव्हा ते म्हणाले 'सर्वांगीण विकासाबाबत नगरपालिकेने केलेले काम इतर नगरपालिकांना आदर्शवत आहे.'[२६]

वरील कार्ये पार पाडून पी.डी. पाटील यांनी कराडचे सांस्कृतिक जीवन संपन्न, समृध्द व संस्कारक्षम केले. गावाचा सर्वांगीण विकास साधताना गावच्या सांस्कृतिक पातळीची व वैचारिक जाणीवेची जाण ठेवली व आपल्या कार्याचा ठसा जनतेच्या मनावर उमटविला आहे.

**सहकार्यमधील कार्य -**

मा.पी. डी. पाटील यांनी केवळ नगराध्यक्ष एवढीच भूमिका पार पाडलेली नाही, तर कराड शहराचा नगराध्यक्ष या नात्याने अनेक उपक्रम राबविले. अनेक सोयीसुविधा लोकांना उपलब्ध करुन दिल्या. येथपर्यंतच त्यांनी आपले कार्य थांबवले नाही तर सहकारी क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवून कराड नगरीचा औद्योगिक व शैक्षणिक विकास घडवून आणला.

**सह्याद्री सहकारी साखर कारखाना -**

पी.डी. पाटील १९६९ साली सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन झाले व अनेक बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली. तसेच दूरदृष्टीने नियोजन करुन या कारखान्याची उभारणी केली. लगेच त्याचे दुसरे विस्तारीकरण करुन प्रतिदिनी ५००० मे.टन गाळप क्षमतेचा तो एक अग्रगण्य साखर कारखाना बनविला. सह्याद्री पॅटर्न म्हणून तो आज महाराष्ट्रात गाजतो आहे. सन १९८८-८९ चा देश पातळीवरील पहिल्या क्रमांकाचा उच्चतम तांत्रिक क्षमता पुरस्कार देऊन भारत सरकारने कारखान्यास व पी.डी. पाटील यांना गौरविले. तसेच त्यांचा साखर कारखानदारीतील अभ्यास अनेकांना मार्गदर्शक ठरला आहे. सह्याद्रीची उभारणी व विस्तार करतानाच कार्यक्षेत्रात कोटयावधी रुपयांच्या अनेक उपसा जलसिंचन योजना उभारल्या व कार्यक्षेत्रातील प्रत्येक शेतकरी बागायतदार करण्याचे आणि प्रत्येक ऊस उतपादक शेतकरी बागायतदार करण्याचे आणि शेतकरी गट, तट, राजकारण बाजूला ठेऊन कारखान्याचा सभासद करुन घेतले. यावरुन कराड शहराप्रमाणे परिसरातील ग्रामीण जीवनाच्या समृध्दीसाठी प्रयत्न केलेले दिसून येतात.[२७]

**शिवाजी शिक्षण संस्था -**

शिक्षण ही लोकशाही राष्ट्राच्या अस्तित्वाची मुलभूत प्रेरणा आहे. पी.डी. पाटील यांची शिक्षण क्षेत्रातील कामगिरी महत्वाची आहे. प्राथमिक शिक्षणाबरोबर माध्यमिक व उच्च शिक्षणालाही त्यांनी प्राधान्य दिले. त्यासाठी अनेक सुविधा शैक्षणिक क्षेत्रात उपलब्ध करुन दिल्या.

१९५५ साली महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन म्हणून त्यांनी काम पाहिले आणि तिचे पुढे शिवाजी शिक्षण संस्थेत विलीनीकरण घडवून आणले.

शिवाजी शिक्षण संस्थेच्या बोर्ड ऑफ एज्युकेशनचे स्थापनेपासूनचे तहहयात अध्यक्ष म्हणून त्यांची किर्ती झाली.

**संस्थेची स्थापना -**

सन १९४५ च्या एप्रिल मध्ये ही संस्था रजिस्टर करण्यात आली.[२८] वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीची गरज म्हणून ही संस्था जन्मास आली. मागासलेल्या भागातील विद्यार्थ्यांना प्रकाश देणे आणि शिक्षकांच्या जीवनात स्थैर्य सुरक्षितता निर्माण करणे ही संस्थेची प्रमुख उद्दिष्टे होती. या संस्थेच्या निर्मितीमागे शिक्षकांची निष्ठावंत जिद्द नि आत्मविश्वास होता. मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या प्रेरणेचे सामर्थ्य होते. कणखर एकजूट, प्रखर निर्धार आणि न्यायाची चाड यातून या संस्थेचा जन्म झाला. श्री नारायण घाडगे हे सहाय्यकर्ते व श्री धोंडजी भोसलेसारखे देणगीदारांचा या संस्थेला आधार मिळाला. या संस्थेवर समाजाने पहिल्यापासून अत्यंत आपुलकी आणि सहानुभूतीचे सिंचन केले. त्यामुळे ही शिक्षण संस्था भराभर वाढली. तिच्या शाखा उपशाखा निघाल्या. अंकुराचा वृक्ष बनू लागला व प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सर्वच संस्थेच्या यशस्वीतेला साकारता आलेली आहे. या संस्थेच्या शाखा-उपशाखांच्या विकासाचा आढावा पुढे कालानुक्रमाने घेतला आहे.[२९]

**माने-देशमुख विद्यालय, पाटण -**

पाटणमध्ये १९४८ सुमारास माने-देशमुख या नावाचे एक कर्तव्यतत्पर फौजदार काम करीत होते. गावाचे रक्षण करण्यासाठी गांधी वधोत्तराच्या दंगलीत ४ फेब्रुवारी, १९४८ या दिवशी त्यांनी हौतात्म्य पत्करले. तेंव्हा त्यांच्या नावाने एक माध्यमिक शाळा स्थापन करणेचे पाटण ग्रामस्थांनी ठरविले. पाटण ग्रामस्थांची कर्तव्यपूजा आणि शिवाजी शिक्षण संस्थेची ध्येयवादी वृत्ती यांचा सुमेळ निर्माण झाला आणि श्री

शिवाजी शिक्षण संस्थेची एक शाखा पाटणमध्ये १९५० पासून माने-देशमुख विद्यालय सुरु झाले.

**श्री शिवाजी विद्यालय, मसूर -**

जिथे-जिथे म्हणून ज्ञानदानाचे पवित्र कर्तव्य निष्ठेने चालू असलेले दिसेल तिथे तिथे श्री शिवाजी शिक्षण संस्था पुढे सरसावली. श्री विष्णु मास्तर निगडीकर यांनी मसूर येथे 'न्यू इंग्लिश स्कूल' एक खाजगी क्लास सुरु केला पण स्वातंत्र्यानंतर विष्णुमास्तरांच्या शाळेचे स्वरुप टिकणे शक्य नव्हते म्हणून विष्णू मास्तरांनी शिवाजी शिक्षण संस्थेला विनंती केली व १९५२ साली या संस्थेची एक शाळा येथे सूरु झाली.

**नाईट हायस्कूल, कराड -**

जून १९५९ मध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेने नाईट हायस्कूल सुरु केले. कराडशहर व शहराभोवतालच्या चार दोन मैलाच्या परिसरातील कामगार वर्गाच्या शिक्षणाची सोय व्हावी हा हेतू होता.

विठामाता विद्यालय, कराड -

सन १९६२ मध्ये शहरातील दक्षिण भागाच्या विद्यार्थीनींची माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी या हेतूने कन्या शाळेची स्थापना केली व तीला विठामाता विद्यालय असे नाव दिले.

**श्री शिवाजी विद्यालय, कार्वे -**

श्री शिवाजी शिक्षण संस्थेने कार्वे या गावी माध्यमिक विद्यालय सुरु करण्याचे ठरवले. ११ जून, १९६२ रोजी याची स्थापना झाली.

**शिवाजी विद्यालय प्राथमिक शाळा -**

शिवाजी विद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या सतत वाढत होती आणि कराड शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात नव्याने प्रवेश करुनही या विद्यालयाने आपले स्वतःचे एक

वैशिष्ट्य निर्माण केले होते. शिवाजी शिक्षण संस्थेने शिवाजी विद्यालय प्राथमिक शाळेचा संकल्प जाहीर केला आणि १ एप्रिल, १९४९ साली प्राथमिक शाळा सुरु केली.

**आदर्श प्राथमिक शाळा, कराड -**

तळभाग आणि शिवाजीनगर हे कराडच्या मुख्य वस्तीपासून अलग पडत असल्याने तेथील बालकांच्या प्राथमिक शिक्षणाची गैरसोय होत होती. त्यासाठी १ ऑगस्ट, १९६६ रोजी आदर्श प्राथमिक शाळेची स्थापना केली.

**महाराष्ट्र हायस्कूल, कराड -**

१९४५ साली ज्या महाराष्ट्र हायस्कूलमधून श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या प्रेरक गतीशील आणि पुरोगामी विचारांचे अंकुर पुस्करित झाले त्या महाराष्ट्र हायस्कूलच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारावी लागली. १ जुलै, १९६७ रोजी महाराष्ट्र हायस्कूल, कराड श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या स्वाधीन झाले.

**सायन्स कॉलेज, कराड -**

कराडनगरीचे भौगोलिक आणि औद्योगिक स्थान महात्म्य लक्षात घेऊन आणि कोयना धरणामुळे या भागाला येत चाललेले सांस्कृतिक महत्व लक्षात घेऊन या परिसरात जागृत होत असलेल्या लोकांच्या वैज्ञानिक ज्ञानासंबंधीच्या कुतूहलाची गरज भागविणे ही आपली एक शैक्षणिक जबाबदारी आहे असे श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या चालकांना वाटले व यातूनच सायन्स कॉलेजचा सन १९५८ साली जन्म झाला.

यावेळी महाविद्यालय नगरपालिकेच्या वास्तूत भरत होते. संस्थेला स्वतःची इमारत नव्हती. १९६० मध्ये डॉ. आर. डी. शिंगटे यांनी प्राचार्य पदाची जबाबदारी घतली व त्याच वर्षी स्वतःच्या नव्या इमारतीत सायन्स कॉलेज आले. या वर्षी

महाविद्यालय संख्या पर्यंत २५० होती. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या शुभ हस्ते महाविद्यालयाच्या इमारतीचे उद्घाटन झाले.

अशाप्रकारे पी.डी. पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात अतिशय मोलाची कामगिरी पार पाडली आहे.

**प्रितीसंगम सहकारी पाणी पुरवठा संस्था -**

मा. पी.डी. पाटील यांनी १९६६ साली प्रितीसंगम सहकारी पाणी पुरवठा संस्थेची स्थापना केली व तीचे संस्थापक चेअरमन झाले. या संस्थेद्वारे त्यांनी कराडची जिरायत जमीन ओलिताखाली आणली. तिच्या उद्घाटनाच्यावेळी यशवंतराव चव्हाण यांचेही पी.डी. पाटील यांनी केलेल्या अलौकिक कामगिरीकडे पाहून डोळे आनंदाश्रूंनी भरुन आले होते.[१०]

**इतर क्षेत्रे -**

याशिवाय कृष्णा-कोयना सहकारी पाणी पुरवठा मध्यवर्ती संघाचे संस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सदस्य, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे सिनेट सदस्य, शासकीय औद्योगिक तंत्रनिकेतन संस्था निवड मंडळ सदस्य, स्थापनेपासून कृष्णा चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त, यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती प्रतिष्ठापन, मुंबईचे संस्थापक सदस्य, वेणुताई चव्हाण मध्यवर्ती प्रतिष्ठान, मुंबईचे संस्थापक सदस्य, यशवंतराव चव्हाण समाधी उपसमितीचे अध्यक्ष इ. विविध क्षेत्रातील अध्यक्षपदे भूषविली.[११]

**आमदार म्हणून पी.डी. पाटील यांचे कार्य - (१९६०-६७ व १९८०-८५)**

सामाजिक कार्याला राजकीय साज चढवून एका नव्या नेतृत्वाला वाव द्यावा, म्हणून माननीय यशवंतरावजींच्या पुढाकाराने दि. ५ ऑगस्ट, १९६० ते १७ एप्रिल, १९६३ या कालावधीत विधान परिषदेचे सदस्य म्हणून काम केले. पी.डी. पाटील

आमदार होते तेंव्हा स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद सोडून भारताचे पंतप्रधान स्वर्गीय जवाहरलाल नेहरुन यांच्या आग्रहाखातर केंद्रिय संरक्षणमंत्री झाल्यानंतर स्वतःच्या कराड उत्तर मतदार संघाचा राजकीय वारस म्हणून पी.डी. पाटील यांची निवड केली आणि दि. १४ एप्रिल, १९६३ रोजी कराड उत्तर विधानसभा मतदार संघातून प्रचंड मतांनी निवडून आले. २७ एप्रिल, १९६३ ते २८ फेब्रुवारी, १९६७ आणि दि. ९ जून, १९८० ते ८ फेब्रुवारी, १९८५ या कालावधीत विधानसभेत कराड मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले.

या कालावधीत विधानसभेच्या विविध उपसमित्यांचे सदस्य म्हणून उल्लेखनिय कामगिरी केली. त्यात विशेषतः महाराष्ट्र नगरपालिका कायदा, १९६५, जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदा, कमाल जमीन धारणा यांचे मसुदे सुधारण्यासाठी मसुदा तयार करण्यासाठी नेमलेल्या समित्यांमध्ये विशेष कामगिरी केली.[३२] महाराष्ट्र विधान परिषदेत व विधानसभेत ते अभ्यासू आमदार म्हणून परिचित होते. त्यांनी जनहिताचे काही प्रश्न विधान परिषदेत विचारले व त्याची सोडवणूक केलेली दिसते. वानगीदाखल काही प्रश्न पुढीलप्रमाणे -

**दाभडी आणि रावळगांव सहकारी साखर कारखान्यांकडून मिळालेल्या ऊस कराच्या वसुलीबाबत" -**

१. यातील किती रक्कम आतापर्यंत खर्च करण्यात आली?

- श्री एस.जी. बर्वे - ऊसावरील कराची रक्कम कायद्याप्रमाणे काही ठराविक उद्दिष्टांसाठी संपूर्ण राज्यात कोठेही खर्च करता येऊ शकते. त्याप्रमाणे या जिल्हयातही खर्च झालेला आहे. या दोन कारखान्यांच्या क्षेत्रात काही खर्च निश्चितपणे झालेला आहे किंवा नाही याची माहिती मला नाही.

२. ही रक्कम कशासाठी खर्च करावी यासंबंधी काही खुलासा होऊ शकेल काय?

-	एस. जी. बर्वे

३.	प्रत्यक्ष या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात यातील काही रक्कम खर्च करणे जरूर वाटले नाही काय?

-	एस.जी. बर्वे - या जिल्हयात रक्कम खर्च झालेली आहे. या कारखान्याच्या क्षेत्रात ही रक्कम खर्च करण्याची जरुरी असेल तर ती झाली असेल. या कारखान्याच्या क्षेत्राच्या उपयोगासाठी म्हणून यापैकी रक्कम प्रत्यक्ष खर्च झाली आहे किंवा काय याची माहिती सध्या माझ्याजवळ नाही.

**१९६४ साली स्वातंत्र्य दिनादिवशी मालेगाव येथे लावलेला पाकिस्तानी झेंडा"[३४]**

१.	पी.डी. पाटील - हा ध्वज जेंव्हा लावण्यात आला तेंव्हा पोलिस तेथे होते काय?

-	के.पी. पाटील - माहित नाही.

२.	पी.डी. पाटील - तो पाकिस्तानी ध्वज नाही ही माहिती केंव्हा मिळाली?

-	के.पी. पाटील - पंचनामा केल्यावर.

३.	पी.डी. पाटील - ज्या फडक्याचा पंचनामा करण्यात आला ते फडके आता कोठे आहे?

-	के.पी. पाटील - जेथे पंचनामा केला त्या पोलिस स्टेशनमध्ये.

**कोल्हापूरच्या गादीचा वारसा"[३५] -**

१.	पी.डी. पाटील - कोल्हापूरच्या गादीचा वारसा भूतपूर्व अर्थमंत्री (श्री कारखानीस) यांना मिळणार आहे काय?

-	नाईक -

**महाराष्ट्र राज्यात सुरु करणेत येणारे सहकारी साखर कारखाने[३६] -**

१. पी.डी. पाटील - या १९ प्रस्तावांपैकी किती प्रस्तावांना भारत सरकारने मंजूरी दिली आहे?

- बी.जी. खताळ - उत्तरात खुलासा दिला आहे.

२. पी.डी. पाटील - या १९ प्रस्तावित कारखान्यांच्या लोकांना शेअर भांडवल जमा करण्यास सांगितले आहे काय?

- बी.जी. खताळ - जोपर्यंत भारत सरकारकडून मंजूरी येत नाही तोपर्यंत सरकारतर्फे कोणालाही भांडवल जमा करण्यास सांगितले जात नाही.

**पुणे येथील शुक्रवार पेठेतील मारुती मंदिरावर पाकिस्तान देशाचा ध्वज लावलेबाबत[३७] -**

१. पी.डी. पाटील - उत्तरात असे म्हटले आहे की हा ध्वज पाकिस्तान देशाचा नव्हता मग हिंदु-मुसलमानात तेढ निर्माण व्हावी म्हणून मुद्दाम हा ध्वज लावण्यात आला होता आणि तो पाकिस्तानचा नव्हता याची खात्री करुन घेतली काय?

- डी.एस. देसाई - मारुती देवळावर एक हिरवे फडके घालण्यात आले होते आणि त्या कापडाने मूर्ती झाकून टाकण्यात आली. पण तो पाकिस्तानचा ध्वज होता असे म्हणता येणार नाही.

२. पी.डी. पाटील - तेथील लोकांनी मुद्दाम हिंदूंच्या धार्मिक भावना भडकाव्यात म्हणून हे कृत्य केले होते काय?

- देसाई - या सर्व प्रकरणी पोलिस चौकशी चालू आहे.

**गंगापूर येथील सहकारी सोसायटी[३८] -**

१. पी.डी. पाटील - या सोसायटीचे प्रपोजल मध्यवर्ती सरकारकडे पाठविण्यात येईल काय?

- बी.जे. खताळ - सध्याच्या परिस्थितीमध्ये हा प्रश्न उपस्थित होत नाही.

२. पी.डी. पाटील - या लोकांना सावकारी करण्याचा परवाना देण्याचे बंद केल्यास या पध्दतीचा बंदोबस्त होऊ शकेल असे सरकारला वाटत नाही काय?

- खताळ - परवाने कायद्यानुसार दिले जातात तेंव्हा एखाद्या विशिष्ट भागात परवाने देणे बंद करता येणार नाही.

३. परंतु ज्या ठिकाणी बरेचसे लोक बिगर परवाना हा धंदा करतात आणि त्यांच्यावर चेक ठेवण्यास सरकारची यंत्रणा अपुरी पडत आहे ही गोष्ट सरकारला माहित आहे काय?

- खताळ - बिगरपरवाना धंदा करतात हे सरकारला मान्य आहे. परंतु सरकारी यंत्रणा अपुरी आहे हे म्हणणे बरोबर नाही.

४. पी.डी. पाटील - सहकारी सोसायटयांकडून पुरेशा प्रमाणात व लौकर या अदिवासी लोकांना पैसा मिळत नाही म्हणून ते लोक सावकाराकडे वळतात ही गोष्ट खरी आहे.

- खताळ - त्यांची गरज, सहकारी सोसायटयांची कर्ज देण्याची शक्ती त्यात अंतर असण्याची शक्यता आहे. परंतु सोसायटीने अमुक कर्ज पाहिजे असे म्हणता येणार नाही. अर्थात सोसायटयाकडून सोय होत नाही म्हणून ते लोक सावकाराकडे जातात हे म्हणणे तितके बरोबर आहे असे नाही.

**कोतवालांच्या सरकारी बदल्या व त्यांचे पगाराबाबत[39] -**

१. पी.डी. पाटील - कोतवालाला २० रु. मासिक पगार जो दिला जातो. तो पगार त्यांच्या जाण्या-येण्यामध्ये खर्च होतो, याची जाणीव सरकारला आहे काय?

- के.पी. पाटील - जाण्या-येण्याकरिता इतकी रक्कम खर्च करावी लागत नाही.

२. पी.डी. पाटील - कोतवालाला दर आठवडयाला दोन वेळा टपाल आणि पोलिस पाटलाचे सरकारी कामानिमित्त तालुक्याच्या गावाला जावे लागते अशी जी वस्तुस्थिती आहे याची सरकारला जाणीव आहे काय?

- के.पी. पाटील - आज काल पोस्टाच्या सोयी असताना त्यालाच का जावे लागते हे समजले नाही. पूर्वी जावे लागत असे, आता जावे लागत नाही.

३. पी.डी. पाटील - त्याला पैसे घेऊन जावे लागते आणि पैसे पोस्टात पाठविण्याची परवानगी नाही याची सरकारला जाणीव आहे काय?

- के.पी. पाटील - भरणा करण्यासाठी जावे लागत असेल परंतु जे अंतर गावापासून तालुक्याच्या गावात असते ते ५-१० मैलापेक्षा जास्त नसल्याने तो पायी जात असेल किंवा त्याला तसे गेले पाहिजे असा सरकारी नियम आहे.

**प्रशासनात मराठी भाषेचा वापर[40] -**

१. पी.डी. पाटील - हा जो आदेश पाठविण्यात आलेला आहे व त्याची अंमलबजावणी कितपत झाली आहे हे सांगता येईल काय?

- वसंतराव पी. नाईक - इतक्यात सांगता येणार नाही.

२. पी.डी. पाटील - सगळीकडे सरकारी पाटया लावल्या जातात. त्या दरवर्षी मार्च महिन्यात लिहिल्या जातात. त्यापैकी ब-याच पाटया इंग्रजी असल्यामुळे

सामान्य माणसाला त्याचे ज्ञान होत नाही म्हणून सरकार या पाटया इंग्रजीमधून लिहिण्यास बंदी करील काय?

- वसंतराव पी. नाईक - सरकार याचा काळजीपूर्वक विचार करीत आहे.

**इरिगेशन स्कीमवरील अभ्यास गट[४१] -**

१. पी.डी. पाटील - अभ्यासगट तयार केल्यानंतर या अभ्यास गटाने कोणत्याही पध्दतीने अभ्यास करावा यासाठी मार्गदर्शक तत्वे ठरवून दिली आहेत काय?

- शंकरराव चव्हाण - टर्म्स ऑफ रेफरन्स ठरविले आहे. तिस-या पंचवार्षिक योजनेच्या एकूण गतीविषयी आणि कामाविषयी अभिप्राय घ्यावा आणि चौथ्या पंचवार्षिक योजनेत समाविष्ट करावा या योजनेची स्थूलमानाने शिफारस करावी असे सांगितले आहे.

२. पी.डी. पाटील - या अभ्यास गटाचा अहवाल सरकारकडे कधी येईल?

- चव्हाण - आल्यानंतर सांगता येईल.

**म्हैसूर सीमावाद[४२] -**

१. पी.डी. पाटील - या सीमावादाच्या बाबतीत कागदोपत्री जी माहिती उपलब्ध आहे ती सर्व केंद्र सरकारला देण्यात आली आहे काय?

- शहा - आम्ही उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दिलेली आहे.

२. पी.डी. पाटील - म्हैसूर विभागात जे मराठी भाषिक लोक गेले आहेत त्यांच्यावर जुलूम केला जात आहे. अशा तक्रारी सरकारकडे आल्या आहेत काय?

-	शहा - आपण या बाबीवर काही करु शकत नाही, सदरचा विषय हा आपल्या अखत्यारीत येत नसून आपण ही बाब केंद्र सरकारच्या फक्त निदर्शनास आणून देवू.

**पोलिस पाटील यांच्यासंबंधी अटी व नियम[४३] -**

१.	पी.डी. पाटील - वतनदार घराण्यातील पोलिस पाटलासंबंधी ज्या काही अटी होत्या त्या आता काढून टाकल्या आहेत काय?

-	के.पी. पाटील - सर्व अटी उत्तरात दिल्या आहेत.

२.	पी.डी. पाटील - सरकारकडे जे ठराव आले आहेत त्यांचा केंव्हा विचार होणार आहे - जसे त्यांना मानावे कोतवालांना त्यांच्या अधिकाराखाली आणावे वगैरे प्रश्नांचा केंव्हा विचार होणार आहे.

-	के.पी. पाटील - त्यांना ग्रामपंचायतीचे पदसिध्द सभासद करता येत नाही.

**कोल्हापूर - कृषी महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थी[४४] -**

१.	पी.डी. पाटील - या विद्यार्थ्यांना गैरहजर का रहावे लागले याची सरकारने चौकशी केली आहे काय?

-	मोहिते वाय.जे. --

वरील प्रश्नांवरुन पी.डी. पाटील यांचा सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाबाबत किती अभ्यास होता हे लक्षात येते. विधान परिषदेत व विधानसभेत ते नियमित हजर रहात व कामकाजात भाग घेत असत, हे वरील त्यांनी विचारलेल्या प्रश्नांवरुन दिसते.

अशाप्रकारे वरील प्रकरणात मा. पी.डी. पाटील यांच्या सर्वांगीण कार्याचा आढावा घेताना असे निदर्शनास येते की - महात्माजी म्हटले की गांधीजी, 'पंडितजी' म्हटले की जवाहरलाल, वाय.बी. म्हटले की यशवंतरावजी ही त्या त्या काळातील

त्यांच्या कतृत्वाची समीकरणे आहेत. त्याप्रमाणे ‘पी.डी.’ म्हटले की कराडचे कर्तबगार नगराध्यक्ष पांडुरंग दादासो पाटील हे नाव सामान्यापासून असामान्यापर्यंत महाराष्ट्राला सुपरिचित आहे.

लहानपणापासूनच अभ्यासू व समंजसवृत्ती, आपल्या ध्येयावर असीम निष्ठा पण एक सूज्ञ आणि संस्कारित असे राजकीय व्यक्तिमत्व बनले. सामान्य कुटुंबात जन्माला येऊन सुध्दा त्यांनी स्वतःच्या कतृत्वाने विलक्षण यश संपादक केले. सहिष्णू लोकशाहीवादी खिलाडूवृत्ती, वाचन, मनन, चिंतनाद्वारे वैचारिक मंदिराचा पाया भक्कम करण्याचे जणू बाळकडूच त्यांनी प्याल्याचे दिसते. पी.डी. पाटील हे कतृत्वाने बहरणारा भावी कल्पतरु आहे याचे अचूक निदान यशवंतरावजींनी पी.डी. यांच्या तरुणाईतच शोधले आणि त्यांना कराडच्या विकास कार्यात सहभागी करुन घेतले आणि त्यांनी आपल्या प्रेरक शक्तीने कराडचे सांस्कृतिक जीवन संपन्न समृध्द व संस्कारक्षम केले. गावाचा सर्वांगीण विकास साधताना गावच्या सांस्कृतिक पातळीची व वैचारिक जाणीव ठेवली. एखाद्या विकसीत गावाची सांस्कृतिक इयत्ता पहावयाची झाली तर ती गावातील नागरी सुविधांची उन्नती शैक्षणिक संस्था, कलायतेने आणि ग्रंथ शाळा या चार आरशात पहाता येते. या आरशातील कराडचे प्रतिबिंब ही कोणत्याही कराडकराला अभिमान वाटावा असे आहे. मा. पी.डी. पाटील यांची कराड नगरपालिका नगराध्यक्षपदी विराजमान होण्याची जी प्रदीर्घ कारकिर्द निश्चितच अभिमानास्पद असली तरी यापेक्षा त्यांच्या कारकिर्दीत शहरात जो विधायक कामाचा मोठा डोंगर उभा राहिला त्याला नगरपालिकांच्या इतिहासात तोड नाही.

यशस्वी नगराध्यक्ष, शिक्षणमहर्षी, सहकारी क्षेत्रातील कार्यकर्ता, एक अभ्यासू आमदार म्हणून पी.डी. पाटील यांचे कतृत्व उभ्या महाराष्ट्राला माहित आहे. आज त्यांचे वय ८३ वर्षे असून सार्वजनिक कार्यातून जवळजवळ त्यांनी निवृत्ती स्वीकारलेली आहे. तरी पण अनेक क्षेत्रातील कार्यकर्ते पी.डी. पाटील अनुभवाने ज्येष्ठ असल्याने त्यांचा सल्ला घेण्यासाठी त्यांना नेहमी भेटतात, सार्वजनिक कार्यक्रमात मधून मधून ते दिसतात.

# संदर्भ


१. पाटील पी.डी. गौरव विशेषांक - १ जुलै, १९९५, दै. तरुण भारत, पृ. ४.

२. कुलकर्णी रघुनाथ पुरुषोत्तम- माझी जीवन गाथा, पृ. ९२-९३.

३. साप्ताहिक कराड वैभव - लेख - १९९३, पृ. ३.

४. ढवळे ना.वा. दै. सकाळ लेख कात्रण, दि. २.१.१९९३.

५. बागवान इस्माईल इब्राहिम, लेख दैनिक तरुण भारत, सांगली, १ जुलै, १९९५.

६. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक, १४.९.१९९३.

७. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३.

८. साप्ताहिक कराड, १९९३, पृ. ५.

९. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक, १९६१.

१०. पाटील विठ्ठल - लेख - रामप्रताप दिवाळी विशेषांक १९९१.

११. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक - १९६२.

१२. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३.

१३. पाटील विठ्ठल - लेख, रामप्रताप दिवाळी विशेषांक, १९९१.

१४. साप्ताहिक कराड वैभव, १९९३, पृ. १६.

१५. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३.

१६. पाटील विठ्ठल लेख - रामप्रताप दिवाळी विशेषांक - १९९१.

१७. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३.

१८. साप्ताहिक कराड वैभव, १९९३, पृ. ७.

१९. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. १९६४-६५, १९८६.

२०. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३.

२१. साप्ताहिक कराड वभैव, १९९३, पृ. १०.

२२. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९७३-७४.

२३. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३.

२४. पाटील विठ्ठल - लेख - रामप्रताप दिवाळी विशेषांक, १९९१.

२५. साप्ताहिक कराड वैभव, १९९३, पृ. ७.

२६. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३.

२७. साप्ताहिक कराड वैभव, १९९३, पृ. १५.

२८. शिवाजी शिक्षण संस्था, रौप्य महोत्सव स्मृती ग्रंथ, प्रकाशक - प्र.ल. करंबळेकर, मुद्रक - पी.डी.विंगकर, १९७१

२९. कित्ता - पृ. ११९ ते १३४.

३०. साप्ताहिक कराड वैभव - लेख १९९३, पृ. १५.

३१. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३.

३२. कित्ता - १४ सप्टेंबर, १९९३.

३३. विधानसभा डिबेटस - खंड ९, भाग-१ (मार्च-एप्रिल, १९६३), पृ. ९३६.

३४. विधानसभा डिबेटस -खंड ९, भाग-१ (मार्च-एप्रिल, १९६३), पृ. ५४२- ५४३.

३५. विधानसभा डिबेटस - खंड ९, भाग-१ (जुलै-ऑगस्ट, १९६४), पृ. ५५६.

३६. विधानसभा डिबेटस - खंड १३, भाग-१ (जुलै-ऑगस्ट, १९६४), पृ.६०८.

३७. विधानसभा डिबेटस -खंड १३, भाग-१ (जुलै-ऑगस्ट, १९६४), पृ.६७०.

३८. विधानसभा डिबेटस - खंड १३, भाग-१ (जुलै-ऑगस्ट, १९६४), पृ.८८७-८९१.

३९. विधानसभा डिबेटस - खंड १२, भाग-१ (फेब्रुवारी-ऑगस्ट, १९६४) पृ.१७२-१७५.

४०. विधानसभा डिबेटस -खंड १२, भाग-१ (फेब्रुवारी-ऑगस्ट, १९६४), पृ.५९९.

४१. विधानसभा डिबेटस - खंड १२, भाग-१ (फेब्रुवारी-ऑगस्ट, १९६४), पृ.१०५५.

४२. विधानसभा डिबेटस -खंड १६, भाग-१ (जुलै-ऑगस्ट, १९६५), पृ.३.

४३. विधानसभा डिबेटस - खंड १६, भाग-१ (जुलै-ऑगस्ट, १९६५), पृ.२४८.

४४. विधानसभा डिबेटस -खंड १३, भाग-१ (जुलै-ऑगस्ट, १९६५), पृ.५१६.